# 2005 पूर्वी जारी केलेल्या बँक नोटा परत घेतल्या जाणार – रिझर्व्ह बँकेचे स्पष्टीकरण

22 जानेवारी 2014 रोजी या विषयावरिल जारी केलेले प्रेस रिलीज आणि त्या अनुषंगाने केल्या जाणा-या चौकशीला उत्तर म्हणून भारतीय रिझर्व्ह बँक (भारिबँ) याद्वारे स्पष्ट करीत आहे की, 2005 पूर्वी छापलेल्या नोटा बाजारातून काढून घेण्यामागची कारण मिमांसा अशी आहे की या नोटांमध्ये 2005 नंतर छापलेल्या नोटांपेक्षा कमी सुरक्षा वैशिष्ट्ये आहेत. जुन्या सिरीजच्या नोटा चलनातून काढून घेणे ही प्रमाण आंतरराष्ट्रीय प्रथा आहे.

भारतीय रिझर्व्ह बँक  नेहमीच्या कामाचा भाग म्हणून अशा बँक नोटा बँकाद्वारे बाजारातून काढून घेत असते. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दृष्टीने 2005 पूर्वी छापलेल्या व अजून चलनात असलेल्या बँक नोटा जनतेवर खूप मोठा प्रभाव टाकेल इतक्या मोठ्या प्रमाणात नाहीत. तथापि, भारतीय रिझर्व्ह बँक जनतेला सूचित करीत आहे की, त्यांनी त्यांच्या सोयीच्या बँक शाखांमध्ये नोटा बदलण्यास सुरुवात करावी. शिवाय, 1 जुलै 2014 नंतरही जनता त्यांचे ज्या बँकेत खाते आहे अशा बँक शाखांमध्ये जुन्या सिरीजच्या कितीही नोटा बदलू शकते.

भारतीय रिझर्व्ह बँक पुढे असेही आश्वासन देत आहे की, बँक जुन्या सिरीजच्या नोटा काढून घेण्याच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवील व आढावा घेत राहील म्हणजे जनतेची कोणत्याही प्रकारे गैरसोय होणार नाही. असे असले तरी भारतीय रिझर्व्ह बँक  पुनरुच्चार करीत आहे की 2005 पूर्वी छापलेल्या नोटा कायदेशीर चलन म्हणून चालू राहतील.

(अल्पना किलावाला)
प्रधान मुख्य महाप्रबंधक

प्रेस रिलीजः २०१३-२०१४/१४९१

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

---

**<u>ठेकेदारों की पैनलबद्धता हेतु आवेदन आमंत्रण सूचना</u>**

भारतीय रिज़र्व बैंक, संपदा कार्यालय, मुख्य कार्यालय, फोर्ट, मुंबई विभिन्न संवर्गो में अनुमानित लागत रु.1 लाख से रु.100 लाख तक विभिन्न कार्यक्षेत्रों (सिविल, वॉटर प्रुफिंग, स्ट्रक्चरल रिपेअर्स/रिहॅबिलिटेशन, इंटिरियर, इलेक्ट्रिकल, एयर-कंडीशनिंग आदि) के कार्यों को करने के लिए, फर्मों से 3 वर्षों की अवधि हेतु उनकी पैनलबद्धता के लिए, फार्म जो पात्रता क्रेडेंशियल्स को प्रस्तुत करने पर संपदा कार्यालय, मुंबई से भी प्राप्त कर सकते हैं, आवेदन आमंत्रित करता है। विधिवत भरे गए आवेदन फॉर्म को प्रस्तुत करने की अंतिम तारीख 15 मार्च 2013 है। अधिक विवरण तथा आवेदन फॉर्म डाउनलोड करने के लिए कृपया हमारी वेबसाइट www.rbi.org.in एवं www.tendertimes.com पर विजिट करें।।

भारतीय रिज़र्व बैंक
**RESERVE BANK OF INDIA**
**www.rbi.org.in**

---

## कंत्राटदारांची सूची बनविण्यासाठी अर्ज मागविण्याची सूचना

भारतीय रिझर्व्ह बॅंक, संपदा कार्यालय, मुख्य भवन, फोर्ट, मुंबई-1, वेगवेगळी कामे करण्यासाठी (सिव्हिल, वॉटर प्रुफिंग, स्ट्रक्चरल रिपेअर्स/रिहॅबिलिटेशन, इंटिरियर,इलेक्ट्रिकल, एअर कंडिशनिंग वगैरे) विविध वर्गवारीतील अंदाजित रु.1 लाख ते 100 लाख खर्चाची कामे घेण्यासाठी तीन वर्षांच्या कालावधीसाठी सूचीबद्ध करण्यासाठी कंपन्यांकडून अर्ज मागवित आहे. पात्रता निकष सादर करुन संपदा कार्यालयातून सुद्धा अर्ज घेता येतील. पूर्ण भरलेला अर्ज देण्याची शेवटची तारीख 15 मार्च 2013 आहे. अधिक माहिती व अर्ज डाऊनलोड करण्यासाठी आमची वेबसाईट www.rbi.org.in आणि www.tendertimes.com पहावी.